शनिवार, १ जानेवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक १६५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

'भाजयुमो'तर्फे विद्यापीठ कायद्याची होळी/२
रायगड जिल्ह्यात नववर्षाचे जल्लोषात स्वागत/५
श्रीलंकेला नमवून भारत आठव्यांदा आशिया कप विजेता/६

## नववर्षाचा उत्साह, मात्र झपाट्याने वाढणाऱ्या कोरोनामुळे चिंता



**पनवेल :** राज्यात सर्वजण नव्या वर्षाच्या स्वागताची तयारी करत असताना कोरोनानेही डोके वर काढले आहे. कोरोनाचे निर्बंध असले तरी नव्या वर्षाचे स्वागत उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात झाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बहुतेकांनी नववर्षाचे स्वागत घरात राहून करणेच पसंत केले. त्याचबरोबर कोरोना रुग्णांची संख्या वाढून तो आकडा आठ हजारांच्या पार गेला आहे. त्यामुळे नव्या वर्षात पुन्हा एकदा कोरोनाचे संकट राज्यावर घोंगावताना दिसत आहे. त्यातच राज्य सरकारने ३१ डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून ते १५ जानेवारीपर्यंत नवे निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार विवाह समारंभासाठी ५०, तर अंत्यसंस्कारासाठी २० लोक उपस्थित राहतील. धार्मिकस्थळांवर येणाऱ्या भाविकांवरही पोलिसांनी बंधने लागू केली आहेत.

# सिंधुदुर्ग जिल्हा बँकेवर भाजपचे वर्चस्व

## आता बांधणी कोकणातील आगामी निवडणुकांसाठी -राणे

**कणकवली : प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्हा बँकेच्या निवडणुकीत भाजपच्या सिद्धिविनायक सहकार पॅनलने १९ पैकी ११ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून लागलेल्या सिंधुदुर्ग जिल्हा बँक संचालक मंडळाच्या पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतमोजणीनंतर निकाल समोर आले.

सहकारी पणन संस्था शेती प्रक्रिया संस्था व ग्राहक सहकारी संस्था मतदारसंघामध्ये भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष अतुल काळसेकर विजयी झाले आहेत. त्यांनी महाविकास आघाडीच्या सुरेश दळवी यांचा पराभव केला आहे. तर सहकारी संस्था, नागरी पतपुरवठा संस्था, पगारदार नोकरांच्या संस्था मतदारसंघात भाजपचे जिल्हाध्यक्ष राजन तेली पराभूत झाले असून महाविकास आघाडीचे सुशांत नाईक विजयी झाले. दरम्यान, भाजपच्या सिद्धिविनायक सहकार पॅनलला ११, तर महाविकास आघाडीच्या सहकार समृद्धी पॅनलला आठ जागांवर विजय मिळाला आहे. **(पान २ वर..)**

**भाजपची सत्ता आली आहे. माझे सर्व कार्यकर्ते आणि त्यांच्या सोबत नितेश राणे, निलेश राणे आणि जिल्हाध्यक्ष राजन तेली यांच्यामुळे हा विजय मिळाला. आता यापुढे तिन्ही जिल्ह्यांतून विधानसभा आणि लोकसभेत भाजपचेच प्रतिनिधी जातील.**
**-नारायण राणे, केंद्रीय मंत्री**

**सरकारी यंत्रणेचा गैरवापर, पोलिसी दडपशाही, सत्तेची अरेरावी हे सगळे झुगारून मतदारांनी लोकशाही निवडली. सिंधुदुर्ग जिल्हा बँक निवडणुकीत भाजपचा दणदणीत विजय झाला आहे.**
**-देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते**

**सत्तेच्या जोरावर सुरू असलेले राजकारण, केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि आमदार नितेश राणे यांच्यावर सूडबुद्धीने चालवलेल्या कारवायांना ही एक सणसणीत चपराक आहे.**
**-चंद्रकांत पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष**




**पनवेल : सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी थर्टी फर्स्ट व नववर्षाच्या स्वागतासाठी नागरिक पार्ट्यांचे आयोजन करीत असतात. शहराबाहेरील एखाद्या ठिकाणी फिरायला जाणे, तेथे दारू पार्ट्या करणे हे सर्रास पाहावयास मिळते. हे करीत असताना काही अतिउत्साही नागरिक चुकीचे वर्तन करीत असतात. अशा नागरिकांमध्ये जागृती करण्यासाठी पनवेल तालुक्यातील सुकापूर येथील दे धक्का मित्र मंडळाच्या वतीने शुक्रवारी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. (वृत्त पान ३ वर..)**

# भाताणकरांना नववर्षाची भेट

## जलजीवन मिशन अंतर्गत आज पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल, हर घर जल'नुसार भाताण गावात ७१ लाख ५७ हजार रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यात येणार असून या विकासकामांचे भूमिपूजन शनिवारी (दि. १) सायंकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे.




भाताण गावात होणाऱ्या या योजनेचे भूमिपूजन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते होणार आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत सुरू होणाऱ्या या योजनेमुळे भाताण आणि परिसरातील नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी देण्याचा संकल्प लवकरच पूर्ण होणार आहे.









# उलवे नोडमध्ये आरोग्यविषयक सर्व सुविधा मिळण्यास सुरुवात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; मेडरीका क्लिनिकचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्या सुखसुविधा मुंबईमध्ये मिळणार नाही त्या सुविधा विषेश करून आरोग्याच्या बाबतीतील सुविधा उलवे नोडमध्ये मिळण्यास सुरुवात झाली आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. ३१) उलवे नोड येथे केले. ते उलवे नोड येथील मेडरीका ह्या कॉस्मेटीक रिकन्स्ट्रक्टीव्ह गायनेकोलॉजी अ‍ॅण्ड लेझर सेंटर आणि हार्ट, लंग अ‍ॅण्ड वस्क्युलर क्लिनिकच्या उद्घाटनाच्या वेळी बोलत होते.



उलवे नोड परिसरात वाढत्या नागरीकरणामुळे अनेक नवनवीन उद्योग या परिसरात सुरू होत आहे. त्यानुसार उलवे नोड सेक्टर ५ मध्ये डॉ. कमलसिंग जूंत्तून आणि डॉ. चांदणी खरात यांनी मेडरीका' हे कॉस्मेटीक रिकन्स्ट्रक्टीव्ह गायनेकोलॉजी अ‍ॅण्ड लेझर सेंटर आणि हार्ट, लंग अ‍ॅण्ड वस्क्युलर क्लिनिक सुरू केले आहे. या सेंटर आणि क्लिनिकचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, ज्या सुखसुविधा मुंबईमध्ये मिळणार नाही त्या सुविधा विषेश करून आरोग्याच्या बाबतीतील सुविधा उलवे नोडमध्ये मिळण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे डॉ. कमलसिंग जूंत्तून आणि डॉ. चांदणी खरात यांना मेडरीका हे सेंटर आणि क्लिनिक सुरू केले आहे. त्याबद्दल अभिनंदन व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा. तसेच तुम्हाला कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास आम्ही सर्वतोपरी मदत करू असे आश्वासनही दिले.

या कार्यक्रमाच्या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, कोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर, ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील, अनंताशेठ ठाकूर, किशोर पाटील, सरचिटणीस अंकुश ठाकूर, रविशेठ पाटील आदी उपस्थित होते.

# 'भाजयुमो'तर्फे विद्यापीठ कायद्याची होळी



**पुणे :** विद्यापीठ कायदा सुधारणा विधेयकाच्या विरोधात भारतीय जनता युवा मोर्चाच्या (भाजयुमो) वतीने राज्यव्यापी काळे विधेयक होळी आंदोलन करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली विधेयकाची होळी करण्यात आली.

हा आंदोलनाचा पहिला टप्पा असून आता या पुढे या आंदोलनाची मालिका चालवली जाणार आहे. यावेळी प्रदेश महामंत्री सुशील मेंगडे, उपाध्यक्ष अनुप मोरे, प्रदेश सचिव अमृत मारणे, सुजित थिटे, गणेश कुटे, पुणे शहर सरचिटणीस प्रतीक देसरडा, सुनील मिश्रा, दीपक पवार, राजू परदेशी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतकरी सन्मान निधीचा दहावा हप्ता आज बँक खात्यात जमा होणार

## भाजप जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते यांची माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेतकरी सन्मान निधीचा दहावा हप्ता शनिवारी (दि. १ जानेवारी) शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. नरेंद्र मोदी सरकारने छोट्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम पाठवत शेतकऱ्यांना आधार दिला आहे. आजवर या योजनेतून १.६ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे, अशी माहिती भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते यांनी दिली.

पंतप्रधान शेतकरी सन्मान निधीचा दहावा हप्ता शनिवार १ जानेवारी २०२२ रोजी शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. या निमित्ताने पंतप्रधान मोदी हे या योजनेच्या १० कोटी लाभार्थ्यांशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती मोहिते यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. याच कार्यक्रमात ३५१ शेती उत्पादक संघांना अनुदानही वितरीत केले जाणार आहे.

मोहिते यांनी पत्रकात म्हटले आहे की, २४ फेब्रुवारी २०१९ पासून या योजनेला प्रारंभ करण्यात आला. मुख्यतः छोट्या शेतकऱ्यांची गरज ओळखून दोन हेक्टर जमीन असलेल्या शेतकऱ्यांना सन्मान निधी योजनेंतर्गत दरवर्षी सहा हजार रुपयांची आर्थिक मदत केली जाते. गेली तीन वर्षे शेतकरी सन्मान निधी योजना यशस्वीपणे राबविण्यात आली आहे. केंद्रात मोदी सरकार सत्तेत येण्यापूर्वी दीर्घकाळ देशाची व अनेक राज्यांची सत्ता भोगलेल्या काँग्रेसने शेतकऱ्यांना मदत देण्याच्या केवळ घोषणाच केल्या. मोदी सरकारने मात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम पाठवत शेतकऱ्यांना आधार दिला. आजवर या योजनेतून १.६ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली, अशी माहिती मोहिते यांनी दिली.

पान १ वरून

## सिंधुदुर्ग जिल्हा बँकेवर भाजपचे वर्चस्व

या वेळी कणकवलीमधून सतीश सावंत आणि विठ्ठल देसाई या दोन्ही उमेदवारांना समान मते मिळाली होती. समसमान मते पडल्यानंतर चिठ्ठी टाकून आलेल्या निकालात सतीश सावंत पराभूत झाले. सतीश सावंत हे जिल्हा बँकेचे विद्यमान अध्यक्ष होते. तर औद्योगिक संस्था मजूर संस्था जंगल कामगार संस्था मोटार वाहतूक संस्था मतदारसंघातून भाजपचे गजानन गावडे विजयी झाले आहेत. त्यांनी महाविकास आघाडीच्या लक्ष्मण आंगणे यांचा पराभव केला.

दरम्यान, विद्यमान अध्यक्ष सतीश सावंत यांना पराभूत करत भाजपच्या सिद्धिविनायक सहकार पॅनलने ११ जागा जिंकत सिंधुदुर्ग जिल्हा बँकेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. सिंधुदुर्ग जिल्हा बँक निवडणुकीत जिल्हा बँकेचे विद्यमान अध्यक्ष सतीश सावंत व भाजपचे जिल्हाध्यक्ष राजन तेली यांच्यासह एकूण १४ विद्यमान संचालक निवडणूक रिंगणात होते. शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस या महाविकास आघाडीचे सहकार समृद्धी पॅनेल विरुद्ध भाजपचे सिद्धिविनायक सहकार पॅनेल यांच्यात चुरशीची लढत झाली.

### जाहीर नोटीस

**टेनन्सी वि.मा.अर्ज–१०/२०२१**

प्रती,
**कै. द्वारकादास जशनसिंग भंबानी मयत तर्फे वारस**
१. श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
२. श्री. गोबिंद द्वारकादास भंबानी
रा. E-10-A, MIG फ्लॅट्स, ऑप. मेटल फॉरेन,
मायापूरी, न्यू दिल्ली : ११० ०६४
तर्फे अखत्यारी
श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
} अपिलार्थी

**विरुद्ध**

**दामा पदू शेळके मयत तर्फे वारस**
१) निर्मला दगडू कोलंबे
रा. चांधाई, ता. कर्जत, जि. रायगड
२) सुशिला बुट्ट्या शेळके
रा. कडाव, ता. कर्जत, जि. रायगड
३) शकुंतला कृष्णा भोईर
रा. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
**४) तहसीलदार कर्जत**
५) रविंद्र आर. शेट्टी
रा. गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड
६) संतोष पुंडलिक सकपाळ
रा. रिद्धी सिद्धी को.हौ.सो.,
रुम नं. B-502, डायमंड गार्डन, चेंबूर, मुंबई–४०० ०७१
} सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे–तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचेकडील टेनन्सी दावा क्र. २७/२००४ दिनांक ४/१२/२००६ चे आदेशाविरुद्ध तसेच फेरफार क्रमांक ४३६, ५१७, १०१६, ११०८, ११८३, ११८४, १२०७, १२६७, १२०८, १३९८, १४३३, १५०२, १५१६ चे विरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दिनांक–०२/०३/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १८/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे–तांबस, ता. कर्जत, जि. रायगड | २४ | २ | १–४३–० | १–२५ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**ठिकाण : कर्जत**
**दिनांक : २७/१२/२०२१**

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत**




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. १ जानेवारी २०२२ रोजी होणारे**

## कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस**
**(वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा–उरण नाका, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. मनुस्मृती रोटरी क्लब, से. ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५. सेंट्रल रेल्वे, पनवेल
- १६. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

**कोव्हॅक्सिन**

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. काळण समाज हॉल, पनवेल
- ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

**पनवेल ग्रामीण लसीकरण**

- जाधववाडी
- चाळ रा.जि.प. शाळा
- सागवाडी
- बीड रा.जि.प. शाळा
- तक्का प.म.पा. शाळा
- खांदा गाव प.म.पा. शाळा
- रोडपाली बौद्धवाडी
- रोडपाली कातकरीवाडी मंदिर
- चाफेवाडी


### जाहीर नोटीस

**टेनन्सी वि.मा.अर्ज–०३/२०२१**

प्रती,
**कै. द्वारकादास जशनसिंग भंबानी मयत तर्फे वारस**
१. श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
२. श्री. गोबिंद द्वारकादास भंबानी
रा. E-10-A, MIG फ्लॅट्स, ऑप. मेटल फॉरेन,
मायापूरी, न्यू दिल्ली : ११० ०६४
तर्फे अखत्यारी
श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
} अपिलार्थी

**विरुद्ध**

**१. अनंत श्रीधर कानडे मयत तर्फे वारस**
१/१) अशोक अनंत कानडे
१/२) किशोर अनंत कानडे
१/३) दशरथ अनंत कानडे
१/४) विठ्ठल अनंत कानडे
१/५) स्नेहल रमेश देशमुख
सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
**२. तहसीलदार कर्जत**
**३. भिमा दगडू जठार मयत तर्फे वारस**
३/१) शुभांगी सुभाष जठार
३/२) चैतन्य सुभाष जठार
३/३) आदिती सुभाष जठार
३/४) विनायक सुभाष जठार
सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
**४. खंडू सहादू जठार मयत तर्फे वारस**
४/१) गबाजी खंडू जठार
४/२) बंडू खंडू जठार, सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
} सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे–पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचेकडील ३२ ग दावा दिनांक ३१/१२/१९५८ चे आदेशाविरुद्ध तसेच फेरफार क्रमांक १९२, ३३३, ३५७, ४४९, ६४८, ६९५, ७६८ चे विरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दिनांक–०२/०३/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १८/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | जुना स.नं./हि.नं. | नवीन स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे–पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड | २९/३ | ७४/३ | ०–०७–० | ०–०२ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**ठिकाण : कर्जत**
**दिनांक : २७/१२/२०२१**

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत**

### जाहीर नोटीस

**टेनन्सी वि.मा.अर्ज–०४/२०२१**

प्रती,
**कै. द्वारकादास जशनसिंग भंबानी मयत तर्फे वारस**
१. श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
२. श्री. गोबिंद द्वारकादास भंबानी
रा. E-10-A, MIG फ्लॅट्स, ऑप. मेटल फॉरेन,
मायापूरी, न्यू दिल्ली : ११० ०६४
तर्फे अखत्यारी
श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
} अपिलार्थी

**विरुद्ध**

**१. अनंत श्रीधर कानडे मयत तर्फे वारस**
१/१) अशोक अनंत कानडे
१/२) किशोर अनंत कानडे
१/३) दशरथ अनंत कानडे
१/४) विठ्ठल अनंत कानडे
१/५) स्नेहलता रमेश देशमुख
सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
**२. तहसीलदार कर्जत**
**३. भिमा दगडू जठार मयत तर्फे वारस**
३/१) शुभांगी सुभाष जठार
३/२) चैतन्य सुभाष जठार
३/३) आदिती सुभाष जठार
३/४) विनायक सुभाष जठार
सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
**४. खंडू सहादू जठार मयत तर्फे वारस**
४/१) गबाजी खंडू जठार
४/२) बंडू खंडू जठार, सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
} सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे–पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचेकडील ३२ ग दावा दिनांक ३१/१२/१९५८ चे आदेशाविरुद्ध तसेच फेरफार क्रमांक १९२, ३३३, ३५७, ४४९, ६४८, ६९५, ७६८ चे विरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दिनांक–०२/०३/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १८/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | जुना स.नं./हि.नं. | नवीन स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे–पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड | २८/२ | ७३/२ | ०–५३–५० | ४–१२ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**ठिकाण : कर्जत**
**दिनांक : २७/१२/२०२१**

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत**

### जाहीर नोटीस

**टेनन्सी वि.मा.अर्ज–०५/२०२१**

प्रती,
**कै. द्वारकादास जशनसिंग भंबानी मयत तर्फे वारस**
१. श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
२. श्री. गोबिंद द्वारकादास भंबानी
रा. E-10-A, MIG फ्लॅट्स, ऑप. मेटल फॉरेन,
मायापूरी, न्यू दिल्ली : ११० ०६४
तर्फे अखत्यारी
श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
} अपिलार्थी

**विरुद्ध**

**१. अनंत श्रीधर कानडे मयत तर्फे वारस**
१/१) अशोक अनंत कानडे
१/२) किशोर अनंत कानडे
१/३) दशरथ अनंत कानडे
१/४) विठ्ठल अनंत कानडे
१/५) स्नेहल रमेश देशमुख
सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
**२. तहसीलदार कर्जत**
**३. भिमा दगडू जठार मयत तर्फे वारस**
३/१) शुभांगी सुभाष जठार
३/२) चैतन्य सुभाष जठार
३/३) आदिती सुभाष जठार
३/४) विनायक सुभाष जठार
सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
**४. खंडू सहादू जठार मयत तर्फे वारस**
४/१) गबाजी खंडू जठार
४/२) बंडू खंडू जठार, सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
} सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे–पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचेकडील ३२ ग दावा दिनांक ३१/१२/१९५८ चे आदेशाविरुद्ध तसेच फेरफार क्रमांक १९२, ३३३, ३५७, ४४९, ६४८, ६९५, ७६८ चे विरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दिनांक–०२/०३/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १८/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | जुना स.नं./हि.नं. | नवीन स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे–पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड | ३६/२ | ८१/२ | ०–९०–० | ०–५३ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**ठिकाण : कर्जत**
**दिनांक : २७/१२/२०२१**

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत**

### जाहीर नोटीस

**टेनन्सी वि.मा.अर्ज–०६/२०२१**

प्रती,
**कै. द्वारकादास जशनसिंग भंबानी मयत तर्फे वारस**
१. श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
२. श्री. गोबिंद द्वारकादास भंबानी
रा. E-10-A, MIG फ्लॅट्स, ऑप. मेटल फॉरेन,
मायापूरी, न्यू दिल्ली : ११० ०६४
तर्फे अखत्यारी
श्री. सुखदेव द्वारकादास भंबानी
रा. फ्लॅट नं. १०४, १ला मजला, सत्यम पॅलेस,
राहूल शुज जवळ, उल्हासनगर ४२१ ००२
} अपिलार्थी

**विरुद्ध**

**१. अनंत श्रीधर कानडे मयत तर्फे वारस**
१/१) अशोक अनंत कानडे
१/२) किशोर अनंत कानडे
१/३) दशरथ अनंत कानडे
१/४) विठ्ठल अनंत कानडे
१/५) स्नेहल रमेश देशमुख
सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
**२. तहसीलदार कर्जत**
**३. भिमा दगडू जठार मयत तर्फे वारस**
३/१) शुभांगी सुभाष जठार
३/२) चैतन्य सुभाष जठार
३/३) आदिती सुभाष जठार
३/४) विनायक सुभाष जठार
सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
**४. खंडू सहादू जठार मयत तर्फे वारस**
४/१) गबाजी खंडू जठार
४/२) बंडू खंडू जठार, सर्व रा. पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड
} सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे–पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचेकडील ३२ ग दावा दिनांक ३१/१२/१९५८ चे आदेशाविरुद्ध तसेच फेरफार क्रमांक १९२, ३३३, ३५७, ४४९, ६४८, ६९५, ७६८ चे विरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दिनांक–०२/०३/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १८/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | जुना स.नं. | नवीन स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे–पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड | २७/३ | ७२/३ | ०–५३–५० | ४–१२ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**ठिकाण : कर्जत**
**दिनांक : २७/१२/२०२१**

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत**

निवडक



## नवी मुंबईत स्वच्छतेविषयी जनजागृती

**नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण २०२२मध्ये नागरिकांना प्राधान्य हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून लोकसहभागातून स्वच्छता कार्याला दिशा व गतिमानता देण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने 'स्वच्छ सर्वेक्षण २०२२-पथनाट्य स्पर्धा' व 'स्वच्छ सर्वेक्षण २०२२-खुली चित्रकला स्पर्धा' राबविण्यात आली. यामध्ये २० पथनाट्य समूहांनी सहभागी होत स्वच्छतेचा जागर केला. तर विविध वयोगटाच्या २५ स्पर्धकांनी सहभागी होत चित्रांमधून नवी मुंबईचे स्वच्छ, सुंदर रूप साकारले. व्हिक्टरी व्हिजन फाऊंडेशनच्या सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या या पथनाट्य स्पर्धेचे परीक्षण नाट्यकर्मी रवींद्र वाडकर आणि सुनील तांबे यांनी त्या-त्या ठिकाणी जाऊन केले.

## ऐनवेळेस लग्नाला नकार; तरुणावर गुन्हा

**पनवेल :** ठाण्यातील नौपाडा भागात राहणाऱ्या वैभव रमेश बिरवडकर (वय २९) या तरुणाने ऐरोलीतील २६ वर्षीय तरुणीसोबत लग्न जुळवून, तिच्यासोबत साखरपुडा व लग्नाची खरेदी करून लग्नाच्या दोन दिवसांपुर्वी तिच्यसोबत लग्न करण्यास नकार देऊन पलायन केल्याचे उघडकीस आले आहे. वैभव बिरवडकर याने ऐन वेळेस लग्नास नकार देऊन तरुणी व तिच्या कुटुंबीयांची फसवणूक केल्याने रबाळे पोलिसांनी वैभव व त्याची आई सुषमा ऊर्फ पद्मा रमेश बिरवडकर या दोघांविरोधात फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाई

**उरण :** कोरोना व ओमायक्रॉन संसर्गाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांवर दुचाकीस्वारांवर व अन्य वाहनचालकांवर उरणमध्ये कारवाई करण्यात आली. महसूल, ग्रामपंचायत आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी संयुक्तरीत्या कारवाई सुरू केली असून काल नाक्या नाक्यांवर विना मास्क आढळलेल्या नागरिकांवर या पथकातील तलाठी के. डी. मोहिते, ग्रामविकास अधिकारी एम. जी. पवार, ग्रामसेवक रूपम गावंड व पोलीस कर्मचारी यांनी प्रत्येकी ५०० रुपये दंड आकारला आहे. त्यामुळे आत्ता नागरिकांनी मास्क लावणे पसंत केले आहे.



(छाया : जीवन केणी)

# १५ ते १८ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या
# लसीकरणासाठी नवी मुंबई पालिका सज्ज

**पनवेल : वार्ताहर**

ओमायक्रॉनचा धोका लक्षात घेऊन कोविड व्हेरिएंटचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी येत्या ३ जानेवारीपासून १५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या लसीकरणासाठी नवी मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाने तयारी सुरू केली आहे.

या अनुषंगाने महापालिकेमार्फत लसीकरणाचे नियोजन करण्यासाठी आयुक्त अभिजित बांगर यांनी तातडीने बैठक घेत या लसीकरणासाठी कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला दिले आहेत. या वेळी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण कटके उपस्थित होते.



पंतप्रधानांनी १५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना कोविड लसीचा पहिला डोस, तसेच दोन्ही डोस घेतलेल्या आरोग्यकर्मी, पहिल्या फळीतील कोरोना योद्धे, तसेच सहव्याधी असणारे ६० वर्षावरील नागरिक यांना प्रतिबंधात्मक डोस देण्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार नवी मुंबई महापालिकेने नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी आयुक्त बांगर यांनी लसीकरणाचा आढावा घेण्यासाठी आरोग्य विभागाची विशेष बैठक घेतली. या वेळी आयुक्त बांगर यांनी उर्वरित नागरिकांचे लवकरात लवकर लसीकरण करून घेण्यावर भर देण्याचे तसेच नव्याने समाविष्ट होणाऱ्या १५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी पहिला डोस, त्याचप्रमाणे दोन्ही डोस पूर्ण झालेले आरोग्यकर्मी, पहिल्या फळीतील कोरोना योध्दे आणि सहव्याधी असणारे ६० वर्षांवरील नागरिक यांना प्रतिबंधात्मक डोस देण्याबाबत नवीन सेंटर्स सुरू करण्याचे नियोजन करण्याबाबत निर्देश दिले. त्यासोबतच सोसायट्यांमध्ये जाऊनही लसीकरण करण्याचा आराखडा तयार करण्याबाबत सूचना दिल्या.



सध्या कार्यान्वित नसलेल्या कोविड केअर सेंटर्सचाही उपयोग लसीकरणासाठी करण्याबाबत विचार करण्याचे आयुक्तांनी या वेळी सूचित केले. १५ ते १८ वयोगटातील लसीकरणासाठी शाळांमध्ये लसीकरणाची पथके पाठवून लसीकरण करण्याबाबत सांगोपांग विचार करावा व नियोजन करावे, असे आयुक्तांनी निर्देश दिले.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संपूर्ण प्रयत्न केले जात असून नागरिकांनीही विहित वेळेत लसीकरण करून घ्यावे तसेच लसीकरण झाल्यानंतरही मास्कचा नियमित वापर करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त बांगर यांनी केले आहे.

**आतापर्यंत ८५ टक्के नागरिकांचे दोन्ही डोस पूर्ण**

***नवी मुंबई महापालिकेने जलद गतीने लसीकरण पूर्ण करण्याकडे कोविड सेंटर्स संख्येत १०१ पर्यंत वाढ करून सुरुवातीपासूनच काटेकोरपणे लक्ष दिल्याने १८ वर्षांवरील १०० टक्के नागरिकांना कोविड लसीचा पहिला डोस पूर्ण करणारी नवी मुंबई ही एमएमआर क्षेत्रातील पहिली महापालिका ठरली आहे. त्यानंतर दुसऱ्या डोसच्या पूर्णत्वाकडेही महापालिकेने विशेष लक्ष देऊन ८५ टक्के नागरिकांचे दोन्ही डोस पूर्ण केले आहेत.***

## जेबीएसपी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक (जेबीएसपी) संस्थेची ३१वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि. ३०) संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

या सभेला संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर, हरिश्चंद्र पाटील, अनिल भगत, वर्षा प्रशांत ठाकूर, प्रकाश भगत, संजय भगत, सभासद रामचंद्र गायकवाड, अर्चना परेश ठाकूर, सदस्या राज अलोनी, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सीए आर. आर. जखोटीया, आर्किटेक्ट नरेंद्र वाळूंज, सदस्य विश्वनाथ कोळी यांच्यासह जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सर्व शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका आणि विभाग प्रमुख उपस्थित होते.



## पनवेलमधून अडीच कोटींचे अमली पदार्थ हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे शाखा कक्ष ३, अंमली पदार्थ विरोधी कक्ष व अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कक्ष यांनी संयुक्तरित्या कारवाई करीत तालुक्यातील नेरे वाजे रोडवर एका व्यक्तीस ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून दोन कोटी ५० लाख रुपये किंमतीचा मेथ्यॉक्युलॉन पावडर (एमडी) या अमली पदार्थासह पांढरी मारुती स्वीफ्ट, मोबाइल, रोख रक्कम असा मिळून एकूण दोन कोटी ५३ लाख ७० हजार ९०० रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.



याप्रकरणी सदर आरोपीच्या आणखीन दोन साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांसाठी तरुणांना विकण्यासाठी ड्रग्ज आणणारा व्यक्ती कलीम रफिक खामकर (वय ३९, रा. पनवेल) यास एमडी या अमली पदार्थासह नेरे येथून ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे केलेल्या तपासातून पुढे त्याचे सहकारी जकी अफरोज पिट्टु (वय ३३, रा. पनवेल) व सुभाष रघुपती पाटील (वय ४०, रा. पेण, जि. रायगड) यांना या गुन्ह्यात ताब्यात घेण्यात आले. या व्यक्तींकडून एकूण २,५०,००,००० रुपये किमतीचे २ किलो ५०० ग्रॅम एमडी ड्रग्ज हा अमली पदार्थ जप्त केला.

आरोपींविरुद्ध पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. यासोबत एमडी ड्रग्ज तयार करण्याचा कारखाना शोधून तो सिल करण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहे.





**पनवेल : भाताण ग्रामपंचायतीचे सदस्य तानाजी पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी सदस्य गणेश जुमारे, माजी सरपंच गुरुनाथ खारके, माजी उपसरपंच चंद्रकांत मुकादम, सुभाष मुकादम, अनिल भोईर, दीपक दुर्गे आदी उपस्थित होते.**

## बंद ऑफिसमधून साहित्य चोरले

**पनवेल :** एका बंद ऑफिसमध्ये अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून रोख रकमेसह चांदीचे शिक्के, पितळी धातूच्या मूर्त्या व महत्त्वाची कागदपत्रे असा ऐवज चोरून नेला आहे. ही घटना कोन गावाच्या हद्दीत घडली आहे. भृगुपती कामताप्रसाद मिश्रा (वय ५०) यांचे एकता बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपसच्या कार्यालयातील किचन रूमच्या दरवाजाचा कडीकोयंडा व ऑफिसच्या खिडकीला लावलेली लोखंडी ग्रील तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला. या वेळी चोरांनी ५० हजार रुपये रोख रक्कम, चांदीचे शिक्के, पितळी धातूच्या हत्तीच्या दोन मूर्त्या व महत्त्वाची कागदपत्रे असा मिळून जवळपास ६४ हजारो किमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## नवी मुंबईसाठी मार्गिका बांधा; अन्यथा ऐरोली-काटई पुलाचे काम बंद पडू!

### आमदार गणेश नाईक आक्रमक

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली-काटई उन्नत पुलाचा नवी मुंबईकरांसाठी उपयोग झालाच पाहिजे. या पुलावर नवी मुंबईत चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी मार्गिका बांधण्याचा प्रश्न नवी मुंबई महापालिका प्रशासनाने येत्या १५ जानेवारीपर्यंत मार्गी लावला नाही, तर या पुलाचे काम बंद पाडू आणि पालिका मुख्यालयातही आंदोलन करू, असा इशारा आमदार गणेश नाईक यांनी दिला आहे. सिडकोच्या वतीने प्राप्त सुविधा भुखंडांचे नियोजन करून प्रभागनिहाय सुविधा पुरविण्यासाठी आराखडा तयार करण्याची सूचनादेखील त्यांनी आयुक्तांसोबत घेतलेल्या बैठकीमध्ये केली.

या पुलाची निर्मिती करीत असलेल्या एमएमआरडीए प्राधिकरणाने पालिकेकडून काही बाबींची पूर्तता होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. जमीन संपादनाचा विषय असो की एमएमआरडीएला निधी देण्याचा, पालिकेने त्यावर तत्परतेने कार्यवाही करावी. मार्गिकेच्या कामासाठी पालिकेने एका अधिकाऱ्याची कायमस्वरूपी नेमणूक करावी, अशी सूचना आमदार गणेश नाईक यांनी केली.

माजी आमदार संदीप नाईक यांनी या संदर्भात आयुक्तांना सूचना करताना पालिकेने एमएमआरडीए, तसेच सिडको या दोन्ही प्राधिकरणांच्या संपर्कात राहण्यास सांगितले. या पुलावर नवी मुंबईत मार्गिका तयार झाल्यास ठाणे-बेलापूर मार्गावरील ४० टक्के वाहतुकीची समस्या सुटेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावर आयुक्त अभिजित बांगर यांनी पालिका ३५ कोटी रुपये खर्च करण्यास तयार असल्याचे सांगितले.

संदीप नाईक पुढे म्हणाले की, पुलाच्या आड येणारा जलकुंभ आणि जमीन संपादनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच सुविधा भूखंडांसाठी पालिकेने टप्प्याटप्प्याने सिडकोला पैसे देण्याची तयारी दाखवावी. सिडकोकडून प्राप्त होणाऱ्या भूखंडांच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागात सोयीसुविधा पुरविण्याचा आराखडा तयार करावा. त्याची यादी करून सिडकोकडे ती सुपूर्द करावी. आरक्षणाबाबत येत्या ७ जानेवारीला या विषयी उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकेवरील सुनावणीत पालिकेने ठासून भूमिका मांडावी. यावर पालिकेच्या वकीलांसोबत बोलून शहरहिताची भूमिका मांडण्याची तयारी आयुक्त बांगर यांनी दर्शवली.

या बैठकीस माजी खासदार संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, सुधाकर सोनावणे, जयंवत सुतार, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे आदी उपस्थित होते.

## विहिघरमध्ये आज विविध समाजोपयोगी कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील विहिघर येथे नववर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच शनिवारी (दि. १ जानेवारी) साईबाबा मूर्ती स्थापना वर्धापन दिन सोहळा, श्रीसत्यनारायणाची महापूजा, तसेच चिपळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच मंगेश पंढरीनाथ फडके यांच्या वाढदिवस समारंभानिमित्त विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमांना अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.



या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र दळवी, आमदार शशिकांत शिंदे, आमदार महेंद्र थोरवे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, शिवसेनेचे जिल्हा सल्लागार बबन पाटील आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम आणि कुस्त्यांची दंगल होणार आहे. सायंकाळी ६ वाजता उपसरपंच मंगेश पंढरीनाथ फडके यांचा वाढदिवस अभीष्टचिंतन सोहळा होणार आहे. रात्री ९ ते १०.१५ वाजेपर्यंत वारकरी जोड भजन होणार आहे.

कुस्त्यांच्या दंगलीत किताब पटकाविणाऱ्या कुस्तीपटूस २५ हजार रुपये व चार फूट गदा, द्वितीय क्रमांकास १५ हजार रुपये व ३ फूट गदा तर तृतीय क्रमांक १० हजार रुपये व अडीच फूट गदा देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य बैलगाडी रेस संघटनेचे अध्यक्ष तसेच माजी सरपंच पंढरीनाथ फडके आणि कुटुंबीयांनी केले आहे.

## आर्या पारटेची इन्स्पायर अ‍ॅवॉर्डसाठी निवड

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे वाशी येथील मॉडर्न स्कूलची आर्या अंकुश पारटे या इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनीची शासनामार्फत घेतल्या गेलेल्या इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड या अत्यंत महत्त्वाच्या स्पर्धेत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेच्या युगात असे विद्यार्थी विद्यालयाचे नाव मोठे करतात याचा विद्यालयाला अभिमान आहे, असे उद्गार विद्यालयाच्या प्राचार्य सुमित्रा भोसले यांनी तिचे कौतुक करताना म्हटले आहे. 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य दशरथ भगत, विद्यालयाच्या प्राचार्य सुमित्रा भोसले, पर्यवेक्षिका जयश्री शशी धरण या सर्वांनी आर्या पारटे व तिला मार्गदर्शन करणाऱ्या मेघा दीपक भरणुके यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## सुकापूरात थर्टी फर्स्टनिमित्त अतिउत्साही नागरिकांच्या चुका दर्शविणारे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी थर्टी फर्स्ट व नववर्षाच्या स्वागतासाठी नागरिक पार्ट्यांचे आयोजन करीत असतात. शहराबाहेरील एखाद्या ठिकाणी फिरायला जाणे, तेथे दारू पार्ट्या करणे हे सर्रास पहावयास मिळते. हे करीत असताना काही अतिउत्साही नागरिक चुकीचे वर्तन करीत असतात. अशा नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पनवेल तालुक्यातील सुकापूर येथील दे धक्का मित्र मंडळाच्या वतीने शुक्रवारी (दि. ३१) प्रदर्शन तयार केले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.



या प्रदर्शनामध्ये विविध बॅनर्स, मानवी आकृत्यांच्या सहाय्याने थर्टी फर्स्टनिमित्त आयोजित पार्ट्यांमुळे होणारे नुकसान या विषयावर जनजागृती केली.

यामध्ये झाडे लावा झाडे जगवा, दारू बंदी करा, लसीकरण करा आणि कोरोनापासून सुरक्षित रहा, ज्यांना घाई होती ते 'निघून गेले', डोन्ट ड्रिंक अ‍ॅण्ड ड्राईव्ह तसेच दोन अतिमद्यप्राशण केलेले व्यक्तींची आकृती, दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या व्यक्तीचा झालेला अपघाताची प्रतिकृती असे विविध माध्यमातून जनजागृती करण्यात आली आहे.

प्रदर्शनाची मांडणी करण्यासाठी दे धक्का मित्र मंडळाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. समाजाची जागृती करण्याच्या हेतून करण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे नागरिकांनी कौतुक केले आहे.

## संपादकीय

# जगणे हाच जल्लोष

गेली दोन वर्षे अवघे जग कोरोनाच्या घातक विषाणूशी लढते आहे. लढाईत कधी विषाणू शिरजोर होताना दिसतो, तर कधी मानवजात वरचढ ठरते. अंतिमत: हे युद्ध मनुष्यप्राणीच जिंकणार यात शंका नाही. परंतु लढाईचा प्रसंग म्हटला की पारडे वर-खाली होणारच. गेल्या दोन वर्षांमध्ये काही देशांत कोरोनाच्या चार किंवा पाच लाटा आल्या. सुदैवाने भारतात कोरोनाच्या दोनच लाटांचा सामना करावा लागला. त्याला कारणीभूत अर्थातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सजग धोरण आणि आरोग्य यंत्रणांचे परिश्रम होते. आताही आपण त्याच सजगपणाने संभाव्य लाट थोपवत नव्या वर्षाला सामोरे जायचे आहे.

**कोरोना महामारीशी संबंधित महत्त्वाच्या घडामोडींचे आणि चढउतारांचे बारा महिने भूतकाळात ढकलून सारे जग नव्या उमेदीने, नव्या आशेने नववर्षाच्या स्वागताला सज्ज झाले आहे. एरव्ही सर्वसाधारण परिस्थिती असती तर हेच स्वागत मोठ्या जल्लोषात झाले असते. गतवर्षाला निरोप देण्याचा सोहळा असो किंवा नव्या वर्षाचे स्वागत असो, संपूर्ण मानवजात ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री घड्याळात बाराचे ठोके पडले की थरारून जात असे. तो थरार, तो जल्लोष काहीसा कमी झालेला आहे. गेल्या वर्षी दुसऱ्या लाटेत भारतात हाहाकार माजला होता, त्याच्या आठवणी सहजासहजी पुसल्या जाणे शक्य नाही. गेले एकंदरीत संपूर्ण वर्षच भारतीय नागरिकांसाठी आव्हानात्मक होते. कोरोना पाठोपाठ अतिवृष्टी, महापूर आदी नैसर्गिक आपत्तींनीही थैमान घातले. महाराष्ट्रात तर एकीकडे निसर्गाचा प्रकोप आणि दुसरीकडे निर्णायकी सरकारचे नाकर्तेपण या दुहेरी कात्रीमध्ये शेतकरी भरडून निघाला. त्यात भरीस भर म्हणून कोरोनाची दुसरी जबरदस्त लाट आली. या दुसऱ्या लाटेमध्ये नागरिकांची अक्षरश: ससेहोलपट झाली. त्या अस्वस्थ करणाऱ्या आठवणी विसरता येण्याजोग्या नाहीत, परंतु दिवाळी येईपर्यंत पुन्हा परिस्थितीमध्ये सुधारणा झाली. त्यामुळे येणारा काळ निर्भयपणे आणि निर्वेधपणे काढता येईल अशी आशा वाटू लागली, परंतु तेवढ्यात ओमायक्रॉन या कोरोनाच्या नव्या अवताराने नवे थैमान सुरू केले. संकटांचे हे ढग दूर सारून आपल्या सर्वांना नव्या वर्षासाठी सज्ज व्हायचे आहे. नव्या वर्षात प्रवेश करताना आपल्या हाती कोरोना प्रतिबंधक लसी, औषधे आणि ऑक्सिजनचा पुरवठा अशी बरीच आयुधे असल्यामुळे घाबरून जाण्याचे काहीच कारण नाही. ओमायक्रॉन विषाणू फार झपाट्याने संसर्ग पसरवत असला तरी त्याची घातकता कमी असल्याचे वैज्ञानिकांना आढळून आले आहे, परंतु दुधाने ओठ पोळलेला मनुष्य ताकदेखील फुंकून पितो या म्हणीनुसार आपण आपले वैयक्तिक वर्तन ठेवायला हवे. नव्या वर्षाच्या सुरूवातीच्या काळात पुरेशी काळजी घेतली तर बाकीचे संपूर्ण वर्ष आणि नजीकचा भविष्यकाळ निर्विघ्नपणे काढता येईल याचे भान आपण सर्वांनीच ठेवायचे आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेकांनी जे मेजवान्यांचे बेत रचले होते, ते तडीला जाऊ शकले नसतील. जल्लोषाचा हा सारा उत्साह काही काळासाठी राखीव ठेवावा, असे आग्रहपूर्वक सांगावेसे वाटते. नवे वर्ष पुन्हा आव्हानात्मकच असणार आहे. त्यापैकी सर्वांत मोठे आव्हान हे अर्थव्यवस्था वेगाने सुस्थितीत आणण्याचे आहे. कितीही संकटे आली तरी मानवाची उत्क्रांती आणि तिचा वेग कधी मंदावला नाही. त्याच उर्मीने पुन्हा एकदा संकटाशी दोन हात करण्यासाठी तुमच्या-आमच्या हातांना बळ मिळावे याच शुभेच्छा.**

# नव्या वर्षात वाकण-खोपोली राज्यमार्ग होणार पूर्ण



**खबरबात**
**धम्मशील सांवत**

वाकण-पाली-खोपोली राज्यमार्ग नेहमीच या ना त्या कारणाने चर्चेत राहिला आहे. मागील पाच वर्षांपासून सुरू असलेले वाकण-पाली-खोपोली राज्यमार्ग रुंदीकरणाचे काम नववर्षात पूर्णत्वास येणार आहे. त्यामुळे येथील दळणवळण सुलभ होणार आहे. या महिन्यापासून या मार्गाच्या कामाला मोठी गती मिळाली आहे.

आजघडीला या राज्यमार्गाचे ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे. येत्या मार्चपर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन एमएसआरडीसी प्रशासनाने केले आहे, तसेच या मार्गावरील पाली, जांभुळपाडा व भालगुल या तीन महत्त्वाच्या पुलांच्या कामालाही गती आली आहे. हे काम जूनपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

या राज्यमार्गाच्या कामात अनेक अडचणी व समस्या आल्या आहेत. आधीच्या ठेकेदाराने केलेल्या चुका व कामाच्या अयोग्य पद्धतीमुळे महामार्ग रुंदीकरणाच्या कामाची गती मंदावली होती. त्यामुळे एमएसआरडीसी प्रशासनाने ठेकेदाराची खांदापालट करीत ठेकेदार मोनिका कन्स्ट्रक्शनकडून बेग कन्स्ट्रक्शनकडे काम सोपविले होते, मात्र त्यांनीही या कामात ढिलाई दाखविली व दर्जा राखला नाही. त्यामुळे हे काम वरद इन्फ्रा कन्स्ट्रक्शनकडे देण्यात आले आहे.

रासळ, नानोसे, उंबरे, इमॅजिका अशा अनेक ठिकाणी या राज्यमार्गाचे काम अपूर्ण असल्याने पावसाळ्यात या मार्गावर चाकरमानी आणि प्रवाशांना खराब रस्त्यावरून प्रवास करावा लागला. मुसळधार पावसामुळे रस्त्याची डागडुजी योग्य प्रकारे होऊ शकली नाही, मात्र आता या मार्गाच्या कामाला वेग आला आहे. महामार्गाची जी बाजू पूर्ण झाली आहे, त्याच्या दुसऱ्या बाजूचे काम सुरू करण्यात आले आहे. रस्त्याचा जो भाग पावसाळ्यात खूप खराब झाला होता, त्याच्या पॅचवर्कचे काम सुरू झाले आहे. या राज्यमार्गाच्या वाकण-पाली भागातील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणालादेखील सुरुवात झाली आहे. जे काम सुरूच झाले नव्हते, ते आता सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे या राज्यमार्गावरील प्रवासी व वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**कामाचा असाच वेग सुरू राहिला व स्थानिकांचे सहकार्य राहिले, तर मार्च २०२२ पर्यंत वाकण-पाली-खोपोली राज्यमार्गाचे काम संपवायचे नियोजन आहे. या मार्गावरील पुलाच्या कामांनादेखील वेग आला आहे. त्यामुळे खूप समाधान वाटत आहे.**
**-सचिन निफाडे, उपअभियंता, एमएसआरडीसी**

**वाकण-पाली-खोपोली राज्यमार्गावर आता वेगाने कामाला सुरुवात झालेली पाहायला मिळत आहे. कामाचा वेग पाहता लवकरच या मार्गाचे काम पूर्ण होईल, अशी आशा वाटते. तसे झाल्यास प्रवासी व वाहनचालकांची चांगली सोय होईल आणि वाहतुकीच्या दृष्टीने हा मार्ग अधिक सुरक्षित व दर्जेदार होईल.**
**-शरद गोळे, सामाजिक कार्यकर्ते, पाली**





### वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने महत्त्वाचा मार्ग

वाकण-पाली-खोपोली राज्यमार्ग वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय मानला जातो, तसेच हा राज्यमार्ग मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो. त्याबरोबरच येथून विळे मार्गे पुणे आणि माणगावलादेखील जाता येते. त्यामुळे मुंबई-पुणे, तसेच कोकणात जाण्या-येण्यासाठी हा मार्ग महत्त्वाचा व सोईचा आहे. त्यामुळेच या राज्यमार्गाचे रुंदीकरण लवकर पूर्ण झाल्यास प्रवाशांची सोय होईल. मुंबई-गोवा महामार्गावरील ताणदेखील कमी होईल. त्याबरोबरच या पट्ट्यात असलेल्या उद्योगधंद्यांनादेखील याचा अधिक फायदा होणार आहे. अष्टविनायकापैकी पाली तीर्थक्षेत्र विकासालादेखील यामुळे गती मिळणार आहे.

### पुलांच्या कामाला गती

वाकण-पाली-खोपोली या राज्यमार्गावर असलेल्या जांभुळपाडा व भालगुल येथील महत्त्वाच्या पुलांचे काम येत्या जूनपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. पाली व जांभुळपाडा येथील पुलांची उंची कमी आहे. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात अंबा नदीच्या पुराचे पाणी या पुलांवरून जाते. परिणामी तेथील वाहतूक ठप्प होते. या दोन्ही पुलांबरोबरच भालगुल येथील पूलदेखील कमकुवत झाला आहे. या तिन्ही अरुंद पुलावरून क्षमतेपेक्षा अधिक अवजड वाहतूक होते. परिणामी हे तीन्ही पूल धोकादायक झाले आहेत, मात्र आता राज्यमार्गाच्या रुंदीकरणाबरोबरच या तीन्ही पुलांच्याजवळ आता सुमारे ६० ते ७५ टन क्षमता असलेले १६ मीटर रुंद व चार मार्गिका (लेन) असलेल्या नवीन पुलांचे काम सुरू आहे.

# उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू करावे

**कर्जत भाजपची मागणी**

**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

येथील उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू करावे, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या कर्जत मंडळातर्फे करण्यात आली. त्याबाबतचे निवेदन उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे यांना देण्यात आले.

कर्जत, खालापूर तालुक्यातील अनेक लोकांना नियमित डायलिसिस करण्यासाठी पनवेल, वाशी, बदलापूर अथवा मुंबई अशा ठिकाणी जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन भाजपच्या वतीने कर्जत उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू करावे, अशी मागणी करणारे निवेदन सादर करण्यात आले.

भाजप किसान मोर्चा कोकण संपर्क प्रमुख सुनील गोगटे, भाजपचे कर्जत शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, सरचिटणीस प्रकाश पालकर, माजी शहर अध्यक्ष दिनेश सोळंकी, भाजप सोशल मीडिया सहसंयोजक सूर्यकांत गुप्ता, सोशल मीडिया संयोजक मिलिंद खंडागळे, युवा मोर्चा शहर चिटणीस सर्वेश गोगटे, विशाल सुर्वे, दर्पण घारे आदींनी उपजिल्हा रुग्णालय येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे यांची भेट घेतली. या वेळी त्यांनी डायलिसिस सेंटर सुरू करावे, असे विनंती वजा आंदोलनाचे निवेदन डॉ. बनसोडे यांना दिले.



(छाया : संतोष पेरणे)

# खोपोली सुभाषनगर येथे पथदीप खांब उभारण्यास प्रारंभ

## ५० वर्षांच्या मागणीला यश

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील सुभाषनगर येथे विविध विकास कामे करण्याची मागणी ५० वर्षांपासून करण्यात येत होती. त्यातील काही मागण्यांची नगरपालिका प्रशासनाकडून पूर्तता करण्यात येत आहे. त्यापैकी या भागात पथदीपची मागणी स्थानिक ग्रामस्थ व भाजप मीडिया सेलचे राहुल जाधव व काही स्थानिक ग्रामस्थ यांनी केली होती. पथदीप खांब उभारण्यास प्रारंभ झाला आहे. काही जुने खांब बदलण्यात आले, त्याप्रमाणे आठ नवीन खांब उभारण्यात आल्याचे राहुल जाधव यांनी सांगितले. त्यामुळे आता हा परिसर उजळणार असल्याचे सांगून जाधव यांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

खोपोली नगरपालिका हद्दीतील सुभाषनगर येथे ५० वर्षांपासून डांबरी रस्त्यांची मागणी केली जात होती. या रस्त्याला माजी उपनगराध्यक्ष सखाराम जाधव यांचे नाव द्यावे, तसेच पथदीप उभारावेत अशी मागणी केली जात होती. त्याला यश येऊन काही रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे, तसेच वीजेचे जुने खांब बदलण्यास प्रारंभ झाला आहे व काही नवीन खांब उभारण्यात आल्याचे राहूल जाधव यांनी सांगितले. याबाबत त्यांनी महिंद्रा कंपनी तसेच खोपोली पालिका प्रशासन व लोकप्रतिनिधींचे आभार मानले आहेत.



(छाया : विनायक माडपे)

# विद्यार्थ्यांनी उत्तम माणूस होण्याचे स्वप्न बाळगावे -कॅप्टन डॉ. मिलिंद भगत

## सहयोग प्रतिष्ठानतर्फे पोलादपूरमध्ये गुणवंतांचा सत्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी दररोज ४५ मिनिटे तरी व्यायाम करणे आवश्यक असून, प्रथम उत्तम माणूस होण्याचे स्वप्न बाळगावे, असे प्रतिपादन लोणेरे येथील डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे अधिव्याख्याते कॅप्टन डॉ. मिलिंद भगत यांनी पोलादपूर येथे केले.

सहयोग प्रतिष्ठानतर्फे पोलादपूर तालुक्यातील दहावी, बारावीच्या परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यालयांचा व विद्यार्थ्यांचा तसेच आदर्श शिक्षक आणि गुणवंतांचा लोहारे येथील साने गुरुजी विद्यालयाच्या प्रांगणात सत्कार करण्यात आला. त्या वेळी झालेल्या कार्यक्रमात कॅप्टन डॉ. मिलींद भगत बोलत होते. शिक्षण नुसते पैसे कमविण्यासाठी न घेता खऱ्या अर्थाने ज्ञान मिळविण्यासाठी घ्यावे, असे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.

उत्तम ज्ञान मिळवून विद्यार्थ्यांनी आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न बघावे व आपल्या मातृभूमीचे, माता पित्यांचे व शिक्षकांचे ऋण कायम मानावे, असे सहयोग प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष रमेश चव्हाण यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस शहिद सीडीएस बिपिन रावत, त्यांच्या पत्नी तसेच लष्करी अधिकाऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर साने गुरुजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुखदेव मोरे यांच्या नेतृत्वाखाली संचालन केले.



(छाया : शैलेश पालकर)

सहयोगचे कार्यवाह काठाळे यांनी प्रास्ताविक केल्यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी तसेच वरिष्ठ गटशिक्षण अधिकारी सुभाष साळुंखे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी कापडे आणि उमरठ येथील विद्यालयांना शशीताई लाड फिरता स्मृतीचषक देऊन सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापिका सुगंधा वाढवळ, शिक्षक किसन सुरवसे, आदेश साळवी, नारायण चोरगे, शिक्षकेतर कर्मचारी धनराज गोपाळ, गिरीधर दरेकर यांचा या वेळी सत्कार करण्यात आला.

साने गुरुजी विद्यालयाच्या शिक्षिका अंकिता जंगम यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सहयोगचे विश्वस्त सुरेंद्र जाधव, सुभाष ढाणे, मदन एकबोटे, विजय दरेकर, लीलाजी शेडगे, अ. वि. जंगम तसेच मुख्याध्यापक पाटील, साधना चिकणे, संजना शिंदे या वेळी उपस्थित होत्या. सुरेंद्र जाधव यांनी आभार मानले.

# थर्टी फर्स्टसाठी मुरूड पर्यटकांनी गजबजले; ३ जानेवारीपर्यंत मुक्काम

## सर्व लॉजिंग बुक

**मुरूड : प्रतिनिधी**

नववर्षाचे स्वागत आणि जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे पर्यटक मोठ्या संख्येने मुरूडमध्ये दाखल झाले आहेत. मुरूडसह तालुक्यातील काशीद, नांदगाव, सर्वे आदी भागात पर्यटक पसरले आहेत. येथील लॉजिंग ३ जानेवारीपर्यंत फुल्ल झाले आहे. त्यामुळे नव्याने येणाऱ्या पर्यटकांना रूम मिळवताना मोठी समस्या होत आहे.

मुरूड तालुक्यातील काशीद येथील समुद्र किनारा सर्वात लोकप्रिय व प्रसिद्ध आहे. काशीद तेथेही रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांची गर्दी झाली असून हजारोच्या संख्येने पर्यटक मौजमजा करताना आढळून आले. तेथील हॉटेल सी ब्रीझ, मरिना लॉज, गोल्डन स्वान हॉटेल यांच्यासह अन्य हॉटेल व्यवसायिकांनी तीन जानेवारीपर्यंत सर्व रूम बुक असल्याचे सांगितले.

पर्यटकांची संख्या वाढत असताना प्रशासनही सजग झाले आहे. कोरोना, ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील साळाव चेकपोस्टवर पर्यटकांची तपासणी करण्यात येत आहे. पर्यटकांचे दोन डोस पूर्ण आहेत का? प्रत्येकाने मास्क लावला आहे का, याची खातरजमा करण्यात येत आहे. त्याचबरोबर वाहनांचीही तपासणी करण्यात येत आहे. यामध्ये दोषी आढळणाऱ्यांकडून मोठा आर्थिक दंड वसूल केला जात आहे. दरम्यान, हॉटेल्स व लॉजिंग व्यवसायिकांनासुद्धा नियमावली देण्यात आली असून, या नियमांचा भंग करणाऱ्याला पाच ते दहा हजार रुपयांच्या दंड भरावा लागणार आहे.





(छाया : संजय करडे)

# रायगड जिल्ह्यात नववर्षाचे स्वागत

## कोरोनाच्या निर्बंधांमुळे हिरमोड



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सरत्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाचे उत्साहात स्वगत करण्यात आले. कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे जिल्हा प्रशासनाने कडक निर्बंध घातले आहेत. त्यामुळे उत्साहावर काहीसे पाणी पडले.

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नववर्ष स्वागतासाठी दरवर्षी रायगड जिल्ह्यात पर्यटक मोठ्या संख्येने येतात. दोन वर्षे कोरोनाचे निर्बंध असल्यामुळे जिल्ह्यात पर्यटक आले नाहीत. कोरोना कमी झाल्यामुळे यंदा निर्बंध उठवण्यात आले. त्यामुळे पर्यटक जास्त येतील, अशी अपेक्षा होती. परंतु अचानक कोरोना रुग्णांची संख्या वाढू लागाल्याने राज्य सरकारने पुन्हा निर्बंध घातले. रायगड जिल्हा प्रशासनानेदेखील निर्बंध कडक केले.

३१ डिसेंबरनंतर शनिवार व रविवार अशी सुट्टी आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटक रायगड जिल्ह्यात येतील अशी अपेक्षा होती, परंतु कदाचित लॉकडाऊन लागण्याची शक्यता असल्यामुळे अपेक्षेपेक्षा पर्यटकांची गर्दी कमी होती. त्याचा फटका पर्यटन व्यवसायाला बसला. पुढील दोन दिवसात ही गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

गर्दीमुळे कोरोनाचा प्रसार झपाट्याने होण्याची भीती आहे. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांवर निर्बंध लादण्यात आले आहेत. कोरोना लसीचे दोन डोस घेतलेल्या व्यक्तींनाच जिल्ह्यात प्रवेश दिला जाईल, असे फर्मान जिल्हा प्रशासनाने काढले आहे.

रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील २८ पोलीस ठाण्यांमध्ये प्रत्येकी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. हॉटेल, धाबे, कॉटेज, फार्महाऊस येथे गैरकृत्य होणार नाहीत याची तपासणी करण्यात आहे. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून जिल्हातील मुख्य रस्त्यांवर ८१ ठिकाणी एकूण ८३ वाहतूक पोलीस अंमलदार तैनात करण्यात आले आहेत. पोलीस स्टेशन हद्दीतील समुद्र किनारी व पर्यटनाच्या ठिकाणी सुरक्षेकरिता फिक्स पॉईंट, पेट्रोलिंग, नाकाबंदी व बंदोबस्त याकरिता एकूण ७१ पोलीस अधिकारी, ४०२ पोलीस अंमलदार तैनात करण्यात आले आहेत. रात्रीच्या वेळी मद्यसेवन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरुद्ध मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

### दारूच्या दुकानांवर गर्दी

थर्टी फर्स्ट आणि नववर्ष स्वागत म्हणजे मद्यपान हे जणू समीकरणच बनून राहिले आहे. दारू प्यायल्याशिवाय नववर्षाचे स्वागत होवू शकत नाही, असा पायंडाच पडून गेला आहे. त्यामुळे अलिबागमधील सर्वच दारू दुकानांवर गर्दी पहायला मिळाली. बाहेरून आलेले पर्यटक इथल्या दुकानांमध्ये दारू खरेदी करूनच पुढे आपल्या मुक्कामावर जात होते. यात तरूणाईचा अधिक भरणा होता.

### नियमांचा भंग करणाऱ्यांवर कारवाई

कोरोना प्रतिबंधक नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांच्यावर कडक कारवाईला सुरूवात करण्यात आली आहे. मागील दोन दिवसात जिल्ह्यात सव्वातीन लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. हॉटेल्स, रेस्टॉरंट, धार्मिक तसेच सार्वजनिक स्थळे, विवाह सोहळे या ठिकाणीही कारवाई करण्यात येत आहे. विनामास्क बाहेर फिरणाऱ्या ११५ जणांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ५५ हजार रुपये दंडवसूली करण्यात आली आहे.

# पेणमध्ये अडीच लाखाचा गांजा जप्त; एकाला अटक



(छाया : अनिस मनियार)

**पेण, अलिबाग : प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने गुरुवारी (दि. ३०) रात्री पेण फणस डोंगरी येथून सुमारे अडीच लाखांचा २० किलो गांजा हस्तगत केला असून, या प्रकरणात सुशील जोशी नावाच्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाकडून गुरुवारी रात्री पेण परिसरात गस्त सुरू होती. या दरम्यान पोलीस हवालदार राजेश पाटील यांना पेण शहरातील फणस डोंगरी येथे एक इसम गांजा घेऊन उभा असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी तेथे संशयितरीत्या फिरत असलेल्या व्यक्तीला या पथकाने ताब्यात घेतले. सुशील जोशी असे या व्यक्तीचे नाव असून, त्याची झडती घेतली असता बॅगेत सुमारे अडीच लाख रुपये किमतीचा २० किलो ७४० ग्राम गांजा सापडला.

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सुशील जोशी (वय ३५) याला अटक करण्यात आली आहे.

पोलीस उपनिरीक्षक पवनकुमार ठाकूर, हवालदार राजेश पाटील, झेमसे, सुधीर मोरे, हंबीर, सावंत, चव्हाण, पोलीस नाईक म्हात्रे, शिपाई लांबोटे यांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने ही कारवाई केली.


## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
## ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**ट्रान्सफर डिसेंबर २०२१**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | मालमत्ता वर्णन | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | मयुरी हणमंत मुळीक | हरेश सुदाम पारंगे | सदनिका क्र. ३ तळ मजला बि.नं.जी ८ यमुना को.ऑप. हौ.सोसा.लि. शिलोत्तर रायचूर | पवल–३–६९८०–२०२१ | ०६–०४–२०२१ |
| २ | जयंतराव श्रीधर मेढे पुष्पा जयंतराव मेढे | गणेश बाबाराव हंबर्डे मधुमती गणेश हंबर्डे | सदनिका क्र. बी–१२ दुसरा मजला न्यू प्रेरणा को.ऑप. हौ. सोसा. शिलोत्तर रायचूर | पवल–३–१४९२१–२०२१ | २२–०९–२०२१ |
| ३ | योगराज भबुतराव माळी सुनिता योगराज माळी | बद्रीप्रसाद रामलखन यादव | सदनिका क्र. २४ दुसरा मजला बि. १० स्नेहसागर को.ऑप.हौ. सोसायटी शिलोत्तर रायचूर | पवल–२–१६०४२–२०२१ | २२–११ २०२१ |
| ४ | निखिल श्रीधर शैली सहा | मोहम्मद शाह आलम मोहम्मद झहीर खान तस्नीम आलम खान | सदनिका क्र. १७०२,१७वा मजला जे विंग बालाजी सिम्फोनी प्रोजेक्ट जरना को.ऑप.हौ.सोसा. शिलोत्तर रायचूर | पवल–५–१३७७३–२०२१ | ०१–११–२०२१ |
| ५ | ज्ञानप्रकाश एवरेस्ट नाडार मधुमिता नाडार | उत्तम मारुती बामणे गीता उत्तम बामणे | सदनिका क्र. ००२ तळ मजला बी.विंग गंगाधाम १ को.ऑप.हौ. सोसा.लि. पालीदेवद | पवल–२–१९०५–२०२१ | ०१–०२–२०२१ |
| ६ | सुधिर गजानंद शर्मा | मे. ड्रिमलॅण्ड रेसिडेन्सी एस. वाय. मलिक तर्फे अख. अतिक युनुस सय्यद | सदनिका क्र. १६ ए विंग कबीर कॉम्पलेक्स तिसरा मजला, पालीदेवद | पवल–१–१०९५७–२०१२ | ०५–०९–२०१२ |
| ७ | प्रसाद सदानंद कर्ले, गिरीष प्रसाद कर्ले, प्रविणा प्रसाद कर्ले | श्री कृपा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार रमेश रामचंद्र गायकवाड कुंदा हरिश्चंद्र गायकवाड जनार्दन रामचंद्र गायकवाड | सदनिका क्र. ३०४, तिसरा मजला श्री. समर्थ कृपा सुकापूर सहकारी गृह निर्माण संस्था मर्या पालीदेवद | पवल–२–५८९४–२०२१ | ३१–०३–२०२१ |
| ८ | हेमचंद्र नामदेव दहीवदकर | विठ्ठल गंगाराम शेरखाने | सदनिका क्र. ०१ पहिला मजला साई कृपा बिल्डिंग प्लॉट नं.१ पालीदेवद | पवल–१–१६०१३–२०११ | २०–१२–२०११ |
| ९ | बुधाबाई संजय असवले संजय देवजी असवले | विजय महादेव राजीवले वैष्णवी विजय राजीवले | सदनिका क्र. आय २३०७. २३वा मजला आय विंग बालाजी सिम्फोनी आयगील को.ऑप.हौ.सोसा. शिलोत्तर रायचूर | पवल–२–१३४८४–२०२१ | २९–०९–२०२१ |
| १० | प्रकाश पोपटलाल जाधव | पोपटलाल शंकर जाधव अनिता पोपटलाल जाधव | मिळकत क्र. ३३५/९ मौजे पालीदेव ता. पनवेल, जि. रायगड | पवल–५–१५६५८–२०२१ | १०–१२–२०२१ |
| ११ | प्रकाश पोपटलाल जाधव | पोपटलाल शंकर जाधव अनिता पोपटलाल जाधव | मिळकत क्र. ३३५/१० मौजे पालीदेव ता. पनवेल, जि. रायगड | पवल–५–१५६५७–२०२१ | १०–१२–२०२१ |
| १२ | पूजा पोपटलाल जाधव | पोपटलाल शंकर जाधव अनिता पोपटलाल जाधव | मिळकत क्र. ३३५/६ मौजे पालीदेव ता. पनवेल, जि. रायगड | पवल–५–१५६५९–२०२१ | १०–१२–२०२१ |
| १३ | दिपू गंगाधर नायर श्रीदेवी गंगाधरण | विनी वरीद चीरन | सदनिका क्र. २०८ दुसरा मजला ए विंग प्रयाग आंगण शिलोत्तर रायचूर | पवल–४–१३१५४–२०२१ | ०३–१२–२०२१ |
| १४ | प्रशांत जगन्नाथ शेट्टी वैशाली प्रशांत शेट्टी | अरुण महिपती घोलप | सदनिका क्र. २०४,दुसरा मजला बी विंग जन्मोत्री सागर मौजे शिलोत्तर रायचूर | पवल–३–१८३९४–२०२१ | २२–११–२०२१ |
| १५ | विनोद कुमार साहू नीतू देवी | अशोक हरी मोरे | सदनिका क्र. १०१, पहिला मजला सी विंग साक्षी पार्क–२ बि.नं.२, मौजे शिलोत्तर रायचूर | पवल–३–१९०८८–२०२१ | ०२–१२–२०२१ |
| १६ | शशीकांत अप्पा आव्हाड | अप्पा सोपान आव्हाड कैकई अप्पा आव्हाड | सदनिका क्र. ०८ पहिला मजला बि.जी.१ सर्वोदय को.ऑप.हौ. सोसा. शिलोत्तर रायचूर | पवल–५–१२१६७–२०२१ | ०१–१०–२०२१ |
| १७ | रेश्मा अरविंद आव्हाड अरविंद अप्पा आव्हाड | सुरेखा मिलिंद अहिरे | सदनिका क्र. १० पहिला मजला, बि.जी.१ सर्वोदय को. ऑप.हौ.सोसा. शिलोत्तर रायचूर | पवल–५–१४४५३–२०२१ | १७–११–२०२१ |
| १८ | अपर्णा रविंद्र चासकर रविंद्र चंद्रकांत चासकर | राजीव लक्ष्मीनारायण गौर रुपा राजीव गौर | सदनिका क्र. आय १९०५, १९वा मजला आय विंग, इगिल को.ऑप.हौ.सोसा. शिलोत्तर रायचूर | पवल–३–१९७३६ २०२१ | १४–१२–२०२१ |
| १९ | प्रशांत रामचंद्र चौधरी नैना प्रशांत चौधरी | व्ही. शंकरन यादव | सदनिका क्र. ००२ तळ मजला ए विंग बि. नं. एस. ३ सिद्धी को. ऑप.हौ.सोसा. पालीदेवद | पवल–१–१०१३४–२०२१ | २९–१०–२०२१ |
| २० | सुनिल प्रभाकर नांदगांवकर रोहि सुनिल नांदगांवकर | सचिन सिताराम जाधव | सदनिका क्र. १२,दुसरा मजला बि.नं.ए.५ निर्मल को.ऑप.हौ. सोसा. पालीदेवद | पवल–५–२४९६–२०२१ | १४–०२–२०२१ |
| २१ | सागर दिपक पाणिंद्रे | मे.संतोषी माता डेव्हलपर्स तर्फे भागीदार चंद्रकांत चाहू पोपेटा | सदनिका क्र. १०४, पहिला मजला वैष्णवी आशिर्वाद ग्राम. मिळकत क्र. ७७/१, ७७/२, ७७/३, ९०,९३,२०९ मौजे शिलोत्तर रायचूर | पवल–२–८१६६–२०२० | १४–१०–२०२० |
| २२ | प्रमिला सुनित उपाध्याय हिरा नारायण कोटीयन सुनितकुमार नंदलाल उपाध्याय | एव्हरर्ड जोसेफ जेम्स हेस्सिंग | सदनिका क्र. जे २२०३, जे विंग २२ वा मजला जराना को.ऑप.हौ.सोसा.लि. बालाजी सिम्फोनी शिलोत्तर रायचूर | पवल–३–१७२२३–२०२१ | २८–१०–२०२१ |
| २३ | अभय चंद्रकांत पाटील | सुरेश रामभाऊ जाधव | सदनिका क्र. १०१ पहिला मजला. श्री. गणेश रेसिडेन्सी गट नं. ५० ए. प्लॉट नं. ४ मौजे पालीदेवद ता. पनवेल | पवल–२–२७६४–२०१६ | ११–०३–२०१६ |
| २४ | जगदीश बाळकृष्ण पोपेटा | चंद्रकांत चाहू पोपेटा | मालमत्ता क्र. ८९/३ मधील दुसरा मजला क्र. २०१, शिलोत्तर रायचूर | नोटरी सिरीयल नं. २८३१ | २२–१२–२०२१ |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल. जि. रायगड**


# पेणमध्ये मास्क न वापरणाऱ्या दुकानदारांवर कारवाई

## नगर परिषद प्रशासन अधिकारी रस्त्यावर



**पेण : प्रतिनिधी**

कोरोना, ओमायक्रॉनला अटकाव करण्यासाठी पेण नगर परिषद कर्मचाऱ्यांसह आता अधिकारीही कामाला लागले आहेत. नगर परिषदेचे प्रशासन अधिकारी राजाराम नरूटे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि. ३१) पेण बाजारपेठ, नाक्यावरील दुकानांना भेटी देऊन तेथील विनामास्क दुकानदार, कर्मचारी व ग्राहकांवर दंडात्मक कारवाई केली. डिसेंबर महिन्यात पेण नगर परिषदेच्या पथकाने सुमारे ३५ हजार रुपयांची दंडवसुली केली आहे.

३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर दुकानात, नाक्यावर गर्दी होणार नाही याची दक्षता पेण पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला असून दुसऱ्या लाटेनंतर आता ओमायक्रॉन विषाणू संसर्गाचा फैलाव रोखण्यावर भर देण्यास पेण पालिका आरोग्य विभागाच्या वतीने नागरिकांना वारंवार सूचना देण्यात येत आहेत. जागोजागी दक्षता पथकाकडून तपासणी मोहीम सुरु करण्यात आली आहे.

राज्यात नवे निर्बंध लागू केले असून रात्री ९ ते सकाळी ६ यावेळेत जमावबंदी असून नागरिकांनी याचे पालन करावे, लसीकरण पूर्ण करून घ्यावे असे आवाहन मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी केले आहे. शुक्रवारी प्रशासन अधिकारी राजाराम नरुटे, कर्मचारी कमलाकर आवास्कर, निलेश मोरे, रामधरणे आदींच्या पथकाने पेणमधील दुकाने तपासणी मोहिमेत सहभाग घेतला होता.

# रोह्यात उत्पादन शुल्क विभागाची छापेमारी

## लाखो रुपयांची विदेशी दारू जप्त

**रोहे : प्रतिनिधी**

उत्पादन शुल्क विभागाने रोहे तालुक्यातील यशवंतखार येथे बुधवारी (दि. २९) टाकलेल्या छाप्यात एक लाख ७१ हजार ५६० रुपये किमतीची मॅक्डॉल व हायवर्ड नावाची दारु हस्तगत करण्यात आली.



(छाया : महादेव सरसंबे)

रोहे तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची छापेमारी सुरु आहे. थर्टी फस्ट'च्या अनुषंगाने तालुक्यातील सर्व फार्महाऊसेस, हॉटेल्स, चायनीज सेंटर यांची तपासणी मोहीम राबवत संशयित ठिकाणी थेट छापेमारी करण्यात येत आहे. उत्पादन शुल्क विभागाच्या रायगड जिल्हा अधिक्षिका कीर्ती शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड विभाग निरिक्षक आनंद पवार व त्यांच्या पथकाने रोहे तालुक्यातील यशवंतखार येथे बुधवारी छापा टाकत गोवा बनावटीची एक लाख ७१ हजार ५६० रुपये किमतीची विदेशी दारु जप्त केली. या छाप्यात उत्पादन शुल्क विभागाचे खालापूर दुय्यम निरीक्षक रीतेश खंडारे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक रजनी नरहरी, जवान निमेश नाईक, गणेश घुगे, महिला जवान अपर्णा पोकळे, वाहनचालक नरेश गायकवाड व पंच या पथकाने सहभाग घेतला. यात एका आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कर्जतमध्ये विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाई

## नगर परिषदेने केली ९३०० रुपयांची दंडवसुली

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

नगर परिषदेने कर्जत शहरात विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांवर कारवाई करून दंडवसुलीची मोहीम सुरू केल्याने शुक्रवार (दि. ३१) च्या आठवडा बाजारात असलेले फेरीवाले व नागरिकांची एकच पळापळ उडाली.

गेल्या काही महिन्यांपासून कोरोना संसर्ग कमी झाला होता. मात्र मुंबईत कोरोनाने अचानक उसळी घेतल्याने पुन्हा लॉकडाऊन होते की काय? अशी शक्यता निर्माण झाली आहे. थर्टी फस्ट आणि आठवडा बाजारमुळे शुक्रवारी कर्जतमध्ये गर्दी होत होती. त्याचवेळी कर्जत नगर परिषदेने विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाईची मोहीम हाती घेतली होती. आठवडा बाजारात फेरीवाले तसेच ग्रामीण भागातून आलेल्या ग्राहकांच्या तोंडावर मास्क नसल्याने त्यांना दंड भरावा लागला. एक पोलीस आणि नगर परिषदेचे आठ–दहा कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते. त्यांनी विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांकडून ९३०० रुपयांचा दंड वसुल केला.



(छाया : विजय मांडे)

# पोलिसाचा अपघातात मृत्यू



**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण–अलिबाग मार्गावर शुक्रवारी (दि. ३१) सकाळी खंडाळा येथे झालेल्या अपघातात पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. शैलेश गोंधळी (रा. सुतारपाडा) असे त्यांचे नाव असून ते रायगड पोलीस दलात बॉम्बशोधक आणि नाशक पथकात कार्यरत होता.

शैलेश गोंधळी हे शुक्रवारी सकाळी आपल्या मोटारसायकलवरून अलिबागकडे येत होते. खंडाळा येथे पुढे असलेली चारचाकी गाडी मागे घेत असताना त्या गाडीचा धक्का शैलेश यांच्या मोटारसायकलला लागला. त्यामुळे ते गाडीसह रस्त्यावर कोसळले. त्याचवेळी मागून येणारी बस त्यांच्या अंगावरून गेली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. शैलेशच्या अपघाती मृत्यूने पोलीस दलात तसेच परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मे. सिडकोने त्यांच्याकडील १२.५ टक्के योजनेअंतर्गत नवीन भुखंडधारक मे. श्री इंटरप्रायझेस (भागीदारी संस्था) वतीने भागीदार (१) श्री. सुरेश देवराम चौधरी, (२) श्री. नवल किसन माने यांच्याकडून त्यांच्या लाभांत हस्तांतरीत करण्यात आलेल्या भुखंडांचे मे. सिडकोकडून भुखंड हस्तांतरणासंदर्भातील पुर्वपरवानगी घेऊन हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे–

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भुखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी नोड, ता. उरण, जि. रायगड | ३३ अ+३३ बी (भुखंड क्र. ५५ शेजारील) | ४७ | २६४९.८५ चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडांचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पुर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करुन घेण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडांचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भुखंडांवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचे भुखंड हे सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहु भुखंडासंदर्भातील संपूर्ण व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/–**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल–ठाकूर**
**पत्ता :** शॉप नं. १४, शिव चेंबर्रस, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८

राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

# महाराष्ट्राच्या महिलांची विजयी पताका



> मागील वेळेस अंतिम फेरीत हरल्यामुळे या वेळी स्वत:ला सिद्ध करण्याचे दडपण सर्व खेळाडूंवर होते. माझ्या कामगिरीचे श्रेय महाराष्ट्राच्या प्रशिक्षकांसह राजमाता जिजाऊ क्रीडा मंडळाच्या अविनाश करवंदे सरांना जाते.
> –प्रियंका इंगळे, महाराष्ट्र

**जबलपूर : वृत्तसंस्था**

बहुप्रतिक्षित वरिष्ठ राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेतील दोन्ही गटांची अंतिम फेरी अपेक्षेप्रमाणे कट्टर प्रतिस्पर्ध्यांमध्ये रंगली, परंतु यंदा महाराष्ट्राच्या महिलांनी २०१९मध्ये झालेल्या पराभवाचा वचपा काढत भारतीय विमानतळ प्राधिकरणाला धूळ चारून जबलपूरमध्ये विजयी जल्लोष केला, मात्र रेल्वेविरुद्ध पुरुषांचे सलग दुसर्‍यांदा विजेतेपद हुकले आहे.

महाराणी लक्ष्मीबाई विद्यालयाच्या क्रीडांगणावर झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने विमानतळ प्राधिकरणावर १३-११ असे प्रभुत्व गाजवले. कर्णधार प्रियंका इंगळे (१.३० मिनिटे संरक्षण, २.१० मि. व आक्रमणात ३ गडी) महाराष्ट्राच्या विजयाची शिल्पकार ठरली. तिला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूच्या 'राणी लक्ष्मीबाई' पुरस्काराने गौरवले. तिला रेश्मा राठोड (१.४० मि., २ मि., २ गडी), अपेक्षा सुतार (१.३० मि., १.५० मि., १ गडी) यांनी अष्टपैलू साथ दिली. विमानतळाकडून प्रियंका भोपी, ऐश्वर्या सावंत चमकल्या.

पुरुषांमध्ये महाराष्ट्र - कोल्हापूरच्या ११ खेळाडूंचा समावेश असलेल्या रेल्वेने अंतिम फेरीत १४-१३ असे एक गुण व १.४० मिनिटांच्या फरकाने हरवले. महेश शिंदे (१.१० मि., २ मि. २ गडी), अक्षय गणपुले (१.१० मि., १.३० मि.) आणि विजय हजारे (१.२० मि, १ गडी) यांनी दमदार कामगिरी केली. महाराष्ट्राकडून दुखापतग्रस्त प्रतीक वाईकर (१.३० मि., १ मि., १ गडी), कर्णधार सुयश गरगटे (१.१० मि., १.४० मि., १ गडी) यांनी चिवट झुंज दिली.







# भारत आठव्यांदा आशिया चषक विजेता

## श्रीलंकेचा ९ गडी राखून पराभव

**दुबई : वृत्तसंस्था**

भारताचा अंडर-१९ संघ आशिया कप चॅम्पियन बनला आहे. दुबईत शुक्रवारी झालेल्या अंतिम सामन्यात त्याने डीएलएस पद्धतीनुसार श्रीलंकेचा ९ गडी राखून पराभव केला. यासह ज्युनियर इंडियन टीम इंडियाने विक्रमी आठव्यांदा अंडर-१९ आशिया कप जिंकला आहे. पाकिस्तानविरुद्धचा सामना हरल्यानंतर भारतीय संघाने स्पर्धेत दमदार पुनरागमन केले आणि अंतिम फेरीत श्रीलंकेचा पराभव केला.

अंतिम सामन्याच्या पहिल्या डावात पावसामुळे व्यत्यय आला आणि सामना ५० षटकांवरून ३८ षटकांचा करण्यात आला. पाऊस येईपर्यंत श्रीलंकेच्या डावातील ३२ षटके पूर्ण झाली होती आणि विश्रांतीनंतर त्यांना फक्त ६ षटके खेळायला मिळाली, मात्र भारतीय गोलंदाजांसमोर श्रीलंकेचे फलंदाज पूर्णपणे अपयशी ठरले आणि त्यांना निर्धारित ३८ षटकांत ९ गडी गमावून केवळ १०६ धावा करता आल्या. ३२ व्या षटकापर्यंत श्रीलंकेने ७ विकेट गमावल्या होत्या. १९८९ पासून, अंडर-१९ आशिया चषक ९ वेळा खेळला गेला, त्यापैकी भारताने आठवेळा विजेतेपद पटकावले.



















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com